**सीएनआर क्र.एमएचएसआय ०७०००००७०२०२२**

**<u>नि.दि.मु.क्र.१७/२०२२ मधील नि.क्र.५ (आय.ए. क्र.१/२०२२) वरील आदेश</u>**

यातील वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.व्ही.धामापुरकर यांचा युक्तिवाद ऐकला. दावा तसेच नि.क्र.५ कडील प्रस्तुत अर्जाचे संपूर्णपणे अवलोकन केले. वादीतर्फे नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे व नि.क्र.९ कडील प्रतिज्ञापत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीच्या कथनांचा व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचा सकृतदर्शनी विचार केला असता, यातील प्रतिवादी क्र.१ यास प्रस्तुत अर्जाबद्दलची नोटीस दिल्याने विलंब झाल्यास, मनाई हुकुम देण्याचा उद्देश विफल होईल अशी परिस्थिती दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी क्र.१ याचे प्रस्तुत अर्जावरील म्हणणे ऐकून न घेता त्याचे विरुध्द कोणताही एकतर्फा तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही, असे माझे मत आहे. प्रतिवादी क्र.१ याचे प्रस्तुत अर्जाचे कामी म्हणणे घेऊनच पुढील योग्य तो आदेश करणे न्यायाच्या दृष्टीने उचित व हितावह ठरणारे आहे. याकारणास्तव, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१) यातील वादी मागत असलेली तुर्तातूर्त मनाईची दाद त्याला का देणेत येऊ नये याकरिता प्रतिवादी क्र.१ याला कारणे दाखवा नोटीस काढणेत यावी.

२) यातील वादीने, मागितले असल्यास, तात्काळ आदेशिका शुल्क व स्वतंत्र बेलिफ मंजूर करणेत येत आहे.

३) नोटीस परतावा दिनांक ०५/०२/२०२२

स्थळ : मालवण
दिनांक : २९/०१/२०२२

आदित्य घ. नाईक
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण